शासन सेवेत कार्यरत असताना अपंगत्व आलेल्या कर्मचाऱ्यास अपंग कायदा (समान संधी, हक्काचे संरक्षण व पूर्ण सहभाग) कायदा १९९५

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : क्रमांक-पीएमआर-०३११/प्र.क्र.३४७/पोल-५अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ८ ऑगस्ट २०११

*** शासन परिपत्रक ***

शासन सेवेत कार्यरत असताना अपंगत्व आलेल्या कर्मचाऱ्यास अपंग कायदा (समान संधी, हक्काचे संरक्षण व पूर्ण सहभाग) कायदा १९९५ च्या कलम-४७ नुसार संरक्षण देण्यात आलेले आहे. मात्र यासंदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्रमांक-३३७/२०११ मध्ये दिनांक ५ जुलै २०११ च्या निर्णयाव्दारे असे निदर्शनास आणून दिले आहे की, पोलीस दलात बऱ्याचशा प्रकरणी सेवेत असताना अपंगत्व आलेल्या कर्मचाऱ्यास रुग्णता अपात्र अथवा रुग्णता सेवानिवृत्त केले जाते. त्यामुळे ही कृती अपंग कायदा १९९५ च्या कलम-४७ चे उल्लंघन करणारी ठरत असल्याने, सेवेत असताना अपंगत्व आलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी अपंग कायदा (समान संधी, हक्काचे संरक्षण व पूर्ण सहभाग) कायदा १९९५ च्या कलम-४७ मधील तरतुदी विचारात घेऊन त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. या अधिनियमातील तरतुदी सर्व संबंधितांच्या तात्काळ निदर्शनास आणण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु.ग.सोनवणे )
शासनाचे उपसचिव, गृह विभाग

प्रति,
१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) अपर पोलीस महासंचालक, पोलीस वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) अपर पोलीस महासंचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) पोलीस संचालक व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण मंडळ, मुंबई.
९) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
११) सर्व पोलीस आयुक्त.
१२) विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३) सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र.
१४) संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
१५) सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक.
१६) सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.
१७) सह पोलीस आयुक्त, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई.
१८) सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.
१९) निवड नस्ती / पोल-५अ

D:\2011\Court/Court-L.lwp/54